स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/४६ महत्त्वाचे आणि तातडीचे दि. २१/०५/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : दिनांक १० जुन २०२६ रोजी, जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी मोहिम आयोजित महाविद्यालयांची माहिती सादर करण्याबाबत..

संदर्भ : १. रासेयो/२०२६–२७/४४,दि.१९ मे २०२६ रोजीचे पत्र
२.मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक:रासेयो–२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष, दि. २१ मे,२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ पत्रान्वये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दि. १० जून २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम या विषयांवर उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ पत्रान्वये मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार दि. १० जून २०२६ रोजी, जागतिक नेत्रदान दिवस निमित्त राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती मा. राज्य संपर्क अधिकारी कार्यालयास तातडीने सादर करावयाची असल्याने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत आपल्या महाविद्यालयामध्ये सदर उपक्रम आयोजनाबाबतची माहिती पुढील गुगल फॉर्ममध्ये https://forms.gle/VHs3GZu6Rfs82tt89 दि. २४ मे २०२६ रोजी, सायं ०६ वाजेपर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

Bhame.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५


**क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष** **दिनांक: २१ मे, २०२६**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित,
सर्व विद्यापीठे/ संचालनालये

**विषय:- दिनांक १० जुन , २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करणे बाबत.....**

**संदर्भ:-** या कार्यासनाचे समक्रमांकाचे दिनांक १८ मे २०२५ चे पत्र कृ. पहावे

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दिनांक १० जुन, २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरून सर्व विद्यापीठ व विद्यापीठातर्गत महाविद्यालयांना सूचित करावे अशा आशयाच्या सुचना संदर्भाधिन पत्रान्वये आपणास कळविण्यात आलेल्या आहेत.

२. त्या अनुषंगाने, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपल्या विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये नेत्रदान जनजागृती अभियानातर्गत मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत आपणाकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच सदरील शिबिर ज्या मविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. त्या महाविद्यालयांचे नांव, मा.प्राचार्य यांचे नांव, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचे नांव, ई-मेल, मोबाईल क्रमांक इ. बाबतची माहिती तात्काळ दिनांक २५ मे, २०२६ रोजी पर्यत रासेयो संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, मंत्रालय, मुंबई यांना अवगत करण्यात यावी.

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत- माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव सादर.**

१.मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२.मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
३.मा. उप सचिव(समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
४.रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५.निवड नस्ती रासेयो कक्ष